 नि 19/B

<u>मा. दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) अंबाजोगाई,
जि. बीड यांच्या न्यायालयात.</u>

<u>रेग्यु.दिवाणी दावा क्रं. १५/२०२६.</u>

वादी: रविकिरण पि. रामचंद्र उर्फ चंदर आडे

रविआडे

<u>विरूद्ध.</u>

रामचंद्र उर्फ चंदर पि. पोमा आडे वगैरे

<u>प्रकरणः-</u> <u>वाटणी करून स्वतंत्र ताबा मिळणेबाबत.</u>

<u>प्रस्तुत दाव्यात वादी आणि प्रतिवादी क्रं. १ व २ यांच्यामध्ये आप-आपासत खालीलप्रमाणे समजपत्र दाखल करण्यात येत आहे.</u>

<u>तडजोड/समजपत्र.</u>

प्रतिवादी क्र.१व२

(1) चंदर आडे

(2) गंगूबाई

१. **हे की,** वादी व प्रतिवादी क्रं. १ व २ हे एकत्र कुटूंबाचे घटक असुन प्रतिवादी क्रं. १ व २ हे आपसात पती-पत्नी असुन ते वादीचे जन्मदाते आई-वडील आहेत. हे उभयतांना मान्य व कबुल आहे. प्रतिवादी क्रं. १ यांना रामचंद्र आणि चंदर या दोन्ही नावाने ओळखले जाते. प्रतिवादी क्रं. १ चे आधार कार्ड हे रामचंद्र नावाने असुन दाव्यातील वादग्रस्त जमीनीचे ७/१२ व ८/अ मध्ये चंदर असे नाव नोंदविले गेले आहे.

२. **हे की,** मौजे. काळवटी लमान तांडा, त. अंबाजोगाई, जि. बीड येथे प्रतिवादी क्रं. १ चे नावे असलेली जमीन गट क्रं.

१/एफ/७/६ एकुण क्षेत्रफळ १ हेक्टर ६२ आर, आकार २ रूपये २५ पैसे तसेच प्रतिवादी क्रं. २ च्या नावे असलेली जमीन गट नंबर १/एफ/७/६ एकुण क्षेत्रफळ १ हेक्टर ६२ आर, आकार २ रूपये २५ पैसे अशा जमीनी असल्याचे उभयतांना मान्य व कबुल आहे.

३. **हे की**, वादी व प्रतिवादी क्रं. १ व २ हे एकत्र कुटूंबाचे घटक असुन वादग्रस्त मिळकतीमध्ये वादीचा कायदेशीर हिस्सा आहे. सदर वादग्रस्त मिळकतीच्या वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये आजतागायत कधीही, कसल्याही प्रकारे वाटण्या झालेल्या नाहीत हे उभयतांना मान्य व कबुल आहे.

४. **हे की,** वादी व प्रतिवादी क्रं. १ व २ यांच्यामध्ये आपसात गैरसमजुतीमधुन प्रस्तुतचे प्रकरण उद्भवले होते. परंतु आता वादी व प्रतिवादी यांनी आपसातील वाद आपअपसात एकमेकांच्या राजीखुशीने मिटला असुन वादग्रस्त मिळकतीच्या वादी व प्रतिवादी यांनी आपसात वाटण्या करून घेण्याचे ठरविले आहे हे वादी व प्रतिवादी क्रं. १ व २ यांना मान्य व कबुल आहे.

५. **हे की,** वादी व प्रतिवादी क्रं. १ यांच्या एकत्र कुटूंबाच्या मिळकतीबाबत पोहचणारे सर्व कायदेशीर हक्क त्यांनी त्यांच्या राजीखुशीने विनाअट आणि विना मोबदला कायमचे वादीच्या हक्कात सोडून दिलेले आहेत. हे वादी व प्रतिवादी क्रं. १ व २ यांना मान्य व कबुल आहे.

६. **हे की,** मौजे काळवटी लमान तांडा, त. अंबाजोगाई, जि. बीड येथे प्रतिवादी क्रं. १ चे नावे असलेली जमीन गट क्रं. १/एफ/७/६ एकुण क्षेत्रफळ १ हेक्टर ६२ आर, आकार २ रूपये २५ पैसे ज्याच्य चतु:सिमा खालीलप्रमाणे आहेत :-

पुर्वेस :- सय्यद अफजलोद्यीन यांची जमीन
पश्चिमेस :- रस्ता.
दक्षीणेस :- गोविंद भाऊराव कोरडे यांची जमीन.
उत्तरेस :- गायरान.

ही जमीन वादी यास या तडजोड/समेटपत्राप्रमाणे वाटून देण्यात आलेली आहे. तसेच प्रतिवादी क्रं. २ नामे गंगुबाई भ्र. रामचंद्र उर्फ चंदर आडे यांना वाटून आलेली जमीन मौजे काळवटी लमान तांडा, ता. अंबाजोगाई, जि. बीड येथील जमीन गट क्रं. १/एफ/७/६ एकुण क्षेत्रफळ १ हेक्टर ६२ आर, आकार २ रूपये २५ पैसे ज्याच्या चतु:सिमा :-

पुर्वेस :- प्रतिवादी क्रं. १ यांची जमीन
पश्चिमेस :- रस्ता.
दक्षीणेस :- गोविंद भाऊराव कोरडे यांची जमीन.
उत्तरेस :- रस्ता.

वर नमुद वादग्रस्त जमीन ही आहे तशी कायम प्रतिवादी क्रं. २ यांच्या नावे कायम ठेवण्यात आलेली आहे.

७. **हे की,** प्रस्तुत समजपत्राआधारे वादी व प्रतिवादी क्रं. १ व २ यांच्यामध्ये आपसात तडजोड/समेटपत्र वर नमुद चतु:सिमेच्या आतील जमीनीबाबत झालेले असुन ते उभयतांना मान्य व कबुल आहे. सदर समजपत्राप्रमाणे त्यांनी आपआपली नावे

महसुल दप्तरी नोंदवुन घ्यावीत व सदर जमीनीचा ते वंश परंपरागत उपभोग घेत जातील, त्यास ते एकमेकांस हरकत अथवा उजर करणार नाहीत. आता, वादी व प्रतिवादी क्रं. १ व २ यांच्यामधील मतभेद संपलेले असुन सदरील वाद प्रस्तुतच्या तडजोड/समेटपत्राद्वारे कायमस्वरूपी मिटला आहे. तरी सदरील तडजोड/समेटपत्राप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येणे योग्य व आवश्यक आहे.

तरी विनंती की,

प्रस्तुतचे प्रकरण वरील तडजोडीप्रमाणे निकाली काढण्यात यावे.

दिनांकः- १४/०३/२०२६.

प्रतिवादी क्रं. १ व २.

१. रामचंद्र उर्फ चंदर पि. पेमा आडे.

२. गंगुबाई भ्र.रामचंद्र उर्फ चंदर आडे.

वादी.

रविकिरण पि.रामचंद्र उर्फ चंदर आडे.

प्रतिवादींतर्फे विधीज्ञ.

ॲड. बी.जी.गायके.
अंबाजोगाई.

वादीतर्फे विधीज्ञ.

ॲड. एन.ए.जाधव,
अंबाजोगाई.

Plaintiffs and defendants and their advocates present. They admitted their signature & verified the contents in the affidavit to be true & correct. Hence Read & Recorded.

[signature] 14-03-24